# —: प्रेसनोट :—

दिनांक : १५/०४/२०२१

फिर्यादी यांच्या नवीन बिलांची रक्कम मंजुर करून देण्याकरीता यातील आरोपी लोकसेवक यांनी स्वत:करीता फिर्यादी यांचे आधीच्या मंजुर बीलातील र. ४०,०००/— लाचेची मागणी केली. सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहाथ पकडण्यात आले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २१ /२०२१ |
| कलम | कलम—७ भ्र. प्र. कायदा १९८८ |
| आरोपी इसम | लक्ष्मण भालचंद्र सुतार, वय ४६ वर्षे, दुय्यम अभियंता (वर्ग—२), आर/मध्य विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, बोरिवली पश्चिम, मंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ४०,०००/— |
| स्विकारलेली लाचेचीरक्कम | रुपये ४०,०००/— |
| थोडक्यात माहीती | यातील फिर्यादी या बृहन्मुंबई महानगर पालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती व त्याअनुषंगाने पथनाटय आयोजन करण्याचे काम करतात.<br>फिर्यादी यांनी सन २०२० मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिका, आर/मध्य विभाग येथे विविध ठिकाणी पथनाटयांचे आयोजन केले होते. त्याअनुषंगाने त्यांचे रू. २,६३,०००/— इतके बील झाले होते. सदरचे बिल मंजुर होवुन त्यांना त्याची रक्कम मिळाली होती, परंतु आलोसे सुतार हे फिर्यादीचे नमूद बील मंजुर केले म्हणुन, सदर रकमेच्या १५ टक्के इतकी रक्कम लाच म्हणुन वारंवार फिर्यादीकडे मागणी करत होते. परंतु फिर्यादी यांनी त्यांचे मागणीकडे लक्ष दिले नव्हते.<br>जानेवारी २०२१ मध्ये फिर्यादी यांनी नमूद कामाकरीता पुन्हा नव्याने कोटेशन भरले होते व त्यांना ते काम मिळाले होते. फिर्यादी यांनी सदरचे काम पुर्ण केले होते. सदर केलेल्या कामाचे बील मंजुर करायचे असेल तर, आधीच्या मंजुर बीलाची १५ टक्के रक्कम म्हणजे ४०,०००/—इतक्या लाचेच्या रकमेची मागणी आलोसे सुतार यांनी फिर्यादी यांचेकडे केली.<br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/०१/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरून पडताळणी करण्यात आली. नमूद पडताळणी दरम्यान आलोसे यांनी एकूण बिलाच्या १५ टक्के रक्कम रू. ४०,०००/— इतक्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक १५/०४/२०२१ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे सुतार यांनी रू. ४०,०००/— इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, त्यांना रंगेहात पकडल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

(सही) १५/४/२१

( निलम वाव्हळ )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल -addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक -www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप -www.acbmaharashtra.net टोल फ्री नं. १०६४

Scanned with CamScanner